Tel. : 91-22-4043 6666
Email : info@bhageriagroup.com
Website : www.bhageriagroup.com

BHAGERIA INDUSTRIES LIMITED

REGD. OFF.: OFFICE NO. 1002, 10TH FLOOR, TOPIWALA CENTRE, OFF S. V. ROAD,
NEAR GOREGAON RAILWAY STATION, GOREGAON (WEST), MUMBAI - 400 062.
CIN : L40300MH1989PLC052574

June 24, 2019.

To,

National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza,
Bandra Kurla Complex,
Bandra (E),
Mumbai- 400051

Ref: Scrip Name: BHAGERIA

BSE Limited
Listing Department
P.J. Towers, 1st Floor,
Dalal Street, Fort,
Mumbai – 400 001

Scrip Code: 530803

Sub: Newspaper Advertisement for Transfer of equity shares to IEPF

Dear Sir/Madam,

Please find enclosed herewith the copies of the advertisement published in today's newspapers (Business Standard & Tarun Bharat) dated 24 June, 2019, titled –Notice to shareholders (for transfer of shares of the Company to Investor Education and Protection Fund)

This is for your information and records.

Thanking You,

Yours faithfully,
For Bhageria Industries Limited

KGaur

Ketan Gaur
Company Secretary
& Compliance officer

BHAGERIA INDUSTRIES LTD.

Business Standard
Dated : 24, June, 2019

BHAGERIA INDUSTRIES LTD.

(CIN : L40300MH1989PLC052574)
Regd Office: Office No. 1002, 10th Floor, Topiwala Centre, Off S.V. Road, Goregaon (West), Mumbai 400062
Tel: +91-22-40436666; Fax: +91-22-40436662
Email:info@bhageriagroup.com; **Website:** www.bhageriagroup.com

NOTICE TO SHAREHOLDERS

(Sub: For transfer of shares of the Company to Investor Education and Protection Fund)

Notice is given pursuant to the provisions of the Companies Act, 2013 read along with the Investor Education and Protection Fund Authority (Accounting Audit, Transfer and Refund) Rules, 2016 with the relevant circulars and amendments thereto ('IEPF Rules'), that the Company has sent intimation to the shareholders concerned regarding transfer of their shares to the Demat Account of the IEPF Authority in accordance with the IEPF Rules, in case they do not encash any of their dividend(s), which remains unpaid/unclaimed for last seven (7) consecutive years, by the next due date i.e. 30th September, 2019. The details of such shareholders including their folio number or DP and Client ID and number of shares due for transfer are also available on the Company's website www.bhageriagroup.com.

The concerned shareholders have been advised to make their claim for the unclaimed dividends in respect of the shares held by them by writing to the Company or the Company's Registrars & Share Transfer Agent, M/s. Sharex Dynamic (India) Pvt. Ltd, C 101, 247 Park, LBS Marg, Vikhroli West, Mumbai-400083. Tel.: 022-28515606, Email: **support@sharexindia.com** Website: **www.sharexindia.com**

In case shareholders wish to claim the shares/dividend after its transfer to IEPF, a separate application has to be made to the IEPF Authority, in form IEPF-5, as prescribed under IEPF Rules and the same is available along with all details at the IEPF website: www.iepf.gov.in.

Place: Mumbai
Date: June 22, 2019.

For Bhageria Industries Limited
Ketan Gaur
Company Secretary

थोडक्यात

'अपॅक'तर्फे फोटोग्राफी' स्पर्धा

मुंबई : नव्या कलाकारांना वाव देण्याच्या हेतूने 'अपॅक'संस्थेच्यावतीने एका विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'अपॅक'मार्फत आयोजित करण्यात आलेली ही सातवी स्पर्धा असून ही स्पर्धा वर्षातून दोन वेळा भरवण्यात येते. यात संपूर्ण देशातून सर्व फोटोग्राफर सहभागी होऊ शकतात. वैविध्यपूर्ण विषय, ओपन जजिंग, होतकरू आणि महिला फोटोग्राफरसाठी विशेष पारितोषिक, फोटोग्राफी क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते अवॉर्ड सरेमनी आणि एनसीपीए, पिरामल आर्ट गॅलरी, नरिमन पॉईंट, मुंबई येथे होणारा फोटो फेस्टीव्हल ही या स्पर्धेची वैशिष्ट्ये आहेत. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क अर्चना देशपांडे-जोशी यांच्याशी ८४५२९६०४८८ किंवा ९३२४२५०३७१ या भ्रमणध्वनी वर संपर्क करावा.

'विनर्स ट्रस्ट'मार्फत मोफत वह्यांचे वाटप

मुंबई : 'विनर्स एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट'च्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या 'जॉय ऑफ गिव्हिंग' म्हणजेच 'माणुसकीचे देणे' या उपक्रमाचे १५ वे सत्र भांडुप येथील स्वामी समर्थ मठात उत्साहात पार पडले. यावेळी भांडुप व परिसरातील १५ शाळांमधील सुमारे सहा हजार वह्यांचे वाटप गरजू शालेय विद्यार्थ्यांना करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत नेत्रतपासणी शिबिरदेखील यावेळी आयोजित करण्यात आले होते. परिसरातील नागरिक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'अहिंसा' संघातर्फे उद्योगमंत्र्यांचा सत्कार

मुंबई : 'अहिंसा संघ,' मुंबई यांच्यावतीने करी रोड येथील 'अविघ्न पार्क' येथे आयोजित करण्यात आलेल्या जिनशासन कार्यक्रमात युवा सेना नेते आदित्य ठाकरे, केंद्रीय मंत्री अरविंद सावंत आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी 'अहिंसा संघ,' मुंबईचे विश्वस्त, पदाधिकारी व सदस्य यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

आझाद मैदानात कोकणवासीयांचे आंदोलन

मुंबई : आपल्या न्याय आणि हक्कांच्या मागण्यांसाठी हजारो कोकणवासीय नागरिक येत्या मंगळवार, दि. २५ जून रोजी आझाद मैदानात आंदोलन करणार आहेत. समृद्ध कोकण संघटना आणि कोकण भूमी प्रतिष्ठान यांच्यावतीने हे आंदोलन उभारण्यात येत आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाविरोधात नसून कोकणवासीयांच्या न्याय्य हक्कांसाठी आहे. किनारपट्टीवरील सीआरझेडच्या प्रश्न सुटला पाहिजे, शासकीय नोकरीत कोकणला ८० टक्के प्राधान्य मिळाले पाहिजे, स्वतंत्र कोकण व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची निर्मिती व्हावी, कोकणासाठी स्वतंत्र पर्यटन विकास प्राधिकरणाची निर्मिती अशा मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येणार आहे.

रिपाइं डांगळे गटाला धक्का

सुजित पगारे यांचा आठवले गटात प्रवेश



मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): रिपब्लिकन पक्षाच्या अर्जुन डांगळे गटाचे केंद्रीय उपाध्यक्ष सुजित पगारे यांनी रविवारी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या रिपाइं (आ) पक्षात जाहीर प्रवेश केला. पगारे यांचा आठवले गटातील प्रवेश म्हणजे हा डांगळे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

सुजित पगारे अनेक वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत कार्यरत आहेत. रिपाइंच्या अर्जुन डांगळे गटामध्ये ते केंद्रीय उपाध्यक्ष म्हणून काम करीत होते. वांद्रे येथील संविधान बंगला येथे आठवले यांची भेट घेऊन सुजित पगारे यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला. आठवले यांनी रिपब्लिकन ऐक्याची घेतलेली भूमिका योग्य असल्याचे ते यावेळी म्हणाले. यासाठी आपण आठवले यांच्या नेतृत्वात रिपाइं (आ) मध्ये प्रवेश केला असून रिपब्लिकन पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण वेळ निष्ठेने काम करण्याचा निर्धार पगारे यांनी यावेळी केला. सुजित पगारे यांचे रिपाइं (आ) मुंबई अध्यक्ष गौतम सोनवणे, हेमंत रणपिसे यांनी स्वागत केले.

राष्ट्रवादीत धुसफूस कायम!

शरद पवार यांच्या उपस्थितीतच राडा

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) : लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेली अंतर्गत धुसफूस अद्यापही कायम असल्याचे चित्र आहे.

रविवारी पक्ष कार्यालयातील बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाल्याने ही बाब चव्हाट्यावर आली. विशेष म्हणजे, पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीतच हा राडा झाल्याने राजकीय वर्तुळात याची दिवसभर चर्चा रंगली होती. मराठवाड्यातील राष्ट्रवादीच्या दोन नेत्यांच्या व्यक्तीगत वादामधून कार्यकर्त्यांमध्ये ही बाचाबाची झाल्याची माहिती समजत असून या घटनेमुळे काही काळ कार्यालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शरद पवारांनी रविवारी राष्ट्रवादी कार्यालयात मराठवाड्यातील चार जिल्ह्यांची बैठक बोलावली होती. येथील नेत्यांसोबत चर्चा करीत असताना, कार्यालयाबाहेर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी स्थानिक राजकारणाच्या वादातून गोंधळ घालण्यास सुरुवात केली. कार्यकर्त्यांच्या धक्काबुक्कीचाही प्रकार घडला. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत कार्यकर्त्यांची पांगापांग केली. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली.

फेसबुक पोस्टवरून वाद?

लोकसभा निवडणुकीत मराठवाडा विभागातून राष्ट्रवादीला एकही जागा जिंकता आली नाही. उस्मानाबाद, परभणी, बीड लोकसभा मतदारसंघात पक्षाचा बोलबाला असूनही लोकसभेत त्यांना अपयशच मिळाले. बीड जिल्ह्यातील पक्षाचे बंडखोर नेते जयदत्त क्षीरसागर यांनी पक्षात फूट पडत भाजप-शिवसेना युतीला खुला पाठिंबा दिला. मराठवाड्यातील परभणी या जागेवर राष्ट्रवादीचा दावा सांगण्यात येत होता. राजेश विटेकर येथून निवडून येतील, असेही सांगण्यात येत होते. मात्र, अंतर्गत गटबाजीचा फटका राष्ट्रवादीला बसला. याबाबत एक फेसबुक पोस्ट करण्यात आली होती. या फेसबुक पोस्टवरील मजकुरावरूनच पक्षातील दोन गटांचे कार्यकर्ते भिडल्याची माहिती आहे.

समाजमाध्यमांवर शिवीगाळ करणाऱ्यांवर कारवाई करा!

काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): समाजमाध्यमांवर अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून धमक्या देणाऱ्यांचे प्रमाण सध्या मोठ्या प्रमाणात वाढीस लागले आहे. समाजमाध्यमांवरील या विकृतांविरोधात वेळीच कडक कारवाई करावी अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून रविवारी केली.

अभिनेत्री केतकी चितळे यांना समाजमाध्यमांवर त्यांनी व्यक्त केलेल्या मतांबद्दल अत्यंत हीन पातळीची भाषा वापरून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करण्यात आली. यानंतर अनेकांनी तीव्र प्रतिक्रिया



व्यक्त केल्या. समाजमाध्यमांवर अशा तऱ्हेच्या अनेक घटना रोज घडत आहेत. गेल्या दोन दिवसांपासून समाजमाध्यमांवर अत्यंत हीन पातळीवर अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली जात असून जाहीर धमक्याही मोठ्या प्रमाणात दिल्या जात आहेत. त्यामुळे अशा कंटकांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सावंत यांनी पत्राद्वारे केली आहे.

विरारमधील 'डिम कन्व्हेन्स' प्रक्रिया सुरू करा!

गृहनिर्माण राज्यमंत्री रवींद्र वायकर यांचे आदेश

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): विरार बोळींज येथील म्हाडाच्या जागेवर इमारती बांधून चार वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला असतानाही कंत्राटदाराने अद्याप सोसायट्या रजिस्टर न केल्याने रेरा कायद्यातील तरतुदींनुसार येथील सर्व इमारतींच्या 'डिम कन्व्हेन्स'ची प्रक्रिया तत्काळ सुरू करा, असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री रवींद्र वायकर यांनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांना दिले.

विरार बोळींज येथील म्हाडाच्या वसाहतींच्या समस्यांबाबत येथील समस्त म्हाडा परिवारातर्फे राज्यमंत्री वायकर यांना निवेदन देण्यात आले होते. त्यानुसार या समस्या सोडविण्यासाठी राज्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थानी बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीला म्हाडा कोकण मंडळातील अधिकारी, कार्यकारी अभियंता, वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त बी. जी. पवार, बोळींज येथील रहिवासी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

येथील रहिवाशांनी वसई-विरार महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी केली असता, या ठिकाणी ६०० मीटरची जलवाहिनी जोडण्याचे काम करताना काही अडचडणी येत असल्याचे वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त यांनी राज्यमंत्री यांच्या निदर्शनास आणले. परंतु, जनतेला मूलभूत सोयीसुविधा देत असताना जर कोणी अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत असेल, तर महानगरपालिकेच्या कायद्यातील तरतुदींचा वापर करून ही अडचण तत्काळ सोडवून बोळींज येथील म्हाडाच्या इमारतींना पाणीपुरवठा सुरू करावा. विकासकांतर्फे ज्या सुविधा देणे अद्याप बाकी आहेत, त्या सर्व कंत्राटदारांकडून पूर्ण करून घ्याव्यात, असे निर्देशही वायकर यांनी दिले.

जादा रक्कम परत करण्याचे आदेश

पझेशन घेताना म्हाडाने रहिवाशांकडून घेतलेले जास्तीचे मेटेनन्स परत करावेत. म्हाडा प्राधिकरणाने मेटेनन्सीची रक्कम कमी केली असून त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी रहिवाशांनी राज्यमंत्री यांच्याकडे केली. यावर म्हाडाने केलेल्या ठरावाप्रमाणे त्यांची तत्काळ अंमलबजावणी करावी, 'डिम कनव्हेन्स' करून सोसायट्या रहिवाशांच्या ताब्यात द्याव्यात. रहिवाशांकडून घेण्यात आलेल्या जादा मेटेनन्सची रक्कमची तपासणी करून नियमानुसार रक्कम घेऊन जादा रक्कम परत करावी, असे निर्देश राज्यमंत्री वायकर यांनी म्हाडाचे कार्यकारी अभियंता बर्वे यांना दिले.

कुंदाताई फाटक यांचा 'पावित्र्य' पुरस्काराने गौरव

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) : डॉ. हेडगेवार स्मारक समितीच्यावतीने देण्यात येणारा 'पावित्र्य पुरस्कार' ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या कुंदाताई फाटक यांना रविवारी प्रदान करण्यात आला. एका विशेष समारंभात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कोकण प्रांताचे संघचालक डॉ. सतीश मोढ यांच्या हस्ते त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी त्या म्हणाल्या, ''मी परिचारिकेच्या नोकरीत असतानाच ज्येष्ठ प्रचारक केशवराव केळकर यांच्या संपर्कात आले. तेव्हा वाडा, जव्हार, विक्रमगड परिसरात जाऊ लागले. तेथील आरोग्य विषयातील अनास्था आणि आजारपणावर उपचार न घेता भगताकडे जाण्याची वृत्ती पाहून ती अंधश्रद्धा मनाला अस्वस्थ करून गेली. मग नोकरी सोडून मी या वनवासी भागातील मुलींच्या शिक्षणाचे काम करू लागले. मुंबईतील गृहिणी विद्यालयाच्या माध्यमातून आजवर साडेतीनशेहून अधिक मुलींना परिचारिकेचे




प्रशिक्षण दिले गेले असून त्यांनी आपल्या वनवासी भागातच काम करून अंधश्रद्धेच्या विळख्यातून आपल्या समाजाला दूर करण्यासाठी काम करावे अशी योजना असून त्याला चांगले यशही आहे. मी राष्ट्र सेविका समितीची सेविका असल्याने त्या संस्कारातूनच स्वाभाविकपणे सेवा करते आहे. यात विशेष काहीच नाही. पण अशा पुरस्काराने बळ वाढते हेही खरेच.''

'बेस्ट'ला सुगीचे दिवस

तीन महिन्यांत वीजग्राहकांमध्ये १० हजारांची वाढ

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): बेस्ट उपक्रमाच्या विद्युत पुरवठा विभागाला पुहा एकदा सुगीचे दिवस आले आहेत. उन्हाळ्यात विजेची मागणी वाढल्याने जानेवारी ते मार्चपर्यंतच्या तीन महिन्यांच्या कालावधीत वीजग्राहकांच्या संख्येत थेट १० हजारांनी वाढ झाली आहे.



बेस्टला टाटा पॉवर कंपनीकडून वीजपुरवठा होतो. यासंदर्भात बेस्टच्या विद्युत उपक्रमातील क्षेत्रात टाटा कंपनीच्या ग्राहकांची नेमकी संख्या, महसूल, मेगावॉट वीजपुरवठा आदींबाबत माहिती अद्ययावत करण्यावर मंगळवारच्या बेस्ट समितीच्या बैठकीत भाजप सदस्य सुनील गणाचार्य यांनी भर दिला. वीजग्राहकांमध्ये वाढ होत असतानाच थकबाकी, वीजचोरीवरील नियंत्रणाचा भागदेखील लक्षात घ्यावा लागेल, असे मत मांडले.

बेस्टच्या १४२ कोटी १२ लाखांपैकी ८८ कोटी ६९ लाख रुपये थकबाकी राज्य आणि खासगी क्षेत्राकडून वसूल झाली आहे. पण अजूनही ५३ कोटींची थकबाकी शिल्लक असल्याची माहिती देण्यात आली.

'बेस्ट' पुन्हा गारेगार!



ताफ्यात आणखी एक हजार वातानुकूलित बस

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) : मुंबईकरांच्या सेवेसाठी प्रयत्नशील असणाऱ्या 'बेस्ट'च्या ताफ्यात आणखी एक हजार वातानुकूलित बस दाखल होणार आहेत. वातानुकूलित अशा एक हजार बससाठी पंधरवड्यात निविदा काढण्यात येणार आहेत. या हजार बसमध्ये मिनी आणि मिडी बसचा समावेश असल्याचे समजते.

सध्या दैनंदिनस्तरावर २५ ते २८ लाखांपर्यंत असलेली प्रवासी संख्या ५० लाखांपर्यंत नेण्याचे उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. त्यासह महिलांसाठी विशेष 'तेजस्विनी' बस ताफाही लवकरच समाविष्ट केला जाणार आहे. बेस्टने प्रवाशांची संख्या वाढविण्यासाठी आणि उत्तम सुविधा देण्यासाठी बसताफा सात हजारांपर्यंत नेण्यात येणार आहे. त्यातील भाडेतत्त्वावरील ५३० बस पहिल्या टप्पात दाखल होतील. बेस्टमधील बसची संख्या वाढविताना उपक्रमाकडून प्रयत्न सुरू असून त्याचा भाग म्हणूनच एसी हजार मिडी, मिनी बस घेण्यात येणार आहेत. त्यासह महिला प्रवाशांसाठी चालविण्यात येणाऱ्या 'तेजस्विनी' बस योजनेसही नव्याने बळ मिळाले आहे. गेली काही वर्षे चर्चा असणाऱ्या 'तेजस्विनी' बसदेखील लवकरच चालविण्यात येत आहे. अशा ३७ 'तेजस्विनी' बस सेवेत येणार असून त्या केवळ महिला प्रवाशांसाठी चालविल्या जातील. राज्य सरकारकडून 'तेजस्विनी' बससेवेसाठी ११ कोटी रुपयांचे अनुदान बेस्टला देण्यात आले आहे. गर्दीच्या ठिकाणी महिला प्रवाशांसाठी या बससेवा चालविण्याचे धोरण आहे.

रिक्षा-टॅक्सीचे दर वाढणार?

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) : मुंबईकरांच्या सेवेसाठी असणाऱ्या रिक्षा-टॅक्सीची भाडेवाढ होण्याची शक्यता आहे. परिवहन विभाग, टॅक्सी संघटना आणि मुंबई ग्राहक पंचायतीच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत टॅक्सी संघटनांनी तीन रुपये भाडेवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे. याशिवाय रिक्षाचे किमान भाडेही १८ रुपयांवरून २१ रुपये होण्याची शक्यता आहे. येत्या मंगळवार, दि. २५ जून रोजी भाडेवाढीवर पुन्हा चर्चा होणार आहे.

गेल्या तीन वर्षांत टॅक्सीच्या भाड्यात वाढ झालेली नाही. परंतु सीएनजीच्या दरात ऑगस्ट २०१७ पासून आतापर्यंत पाच वेळा झालेली वाढ पाहता मुंबई टॅक्सीमेन्स युनियनने भाडेवाढीची मागणी परिवहन विभागाकडे केली आहे. टॅक्सी संघटनांच्या मागणीचा विचार करता शुक्रवारी मंत्रालयात परिवहन सचिव आशिष सिंह, परिवहन आयुक्त शेखर चन्ने, मुंबई टॅक्सीमेन्स युनियनने सरचिटणीस ए. एल. क्वाड्रोस, मुंबई ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष शिरीष देशपांडे यांची बैठक झाली. यात भाडे निश्चितीसाठी खटुआ समितीच्या शिफारसींवर चर्चा झाली. यात टॅक्सी संघटनेने ३० रुपये भाडेवाढीच्या ऐवजी २५ रुपये तरी भाडेवाढ द्या, अशी मागणी केली. भाडेवाढ केल्यास खटुआ समितीतील अन्य प्रवास सवलती मात्र त्वरित लागू करू नका, असेही सांगितले.

मंगळवारी 'हेमोत्सव' कार्यक्रम

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): गत वर्षांच्या कार्यक्रमांचे अवलोकन, मार्गदर्शन, सफलता आणि भविष्यातील



गतिविधीच्या निर्मितीसाठी हेमा फाऊंडेशनच्यावतीने 'हेमोत्सव' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन येत्या मंगळवार, दि. २५ जून रोजी करण्यात आले आहे. मंगळवारी सायंकाळी ५.४५ वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री आशिष शेलार, महानगरपालिका उपायुक्त मिलिंद सावंत, प्रसिद्ध लेखक शिव खेडा आणि प्रख्यात अभिनेते 'पद्मश्री' मनोज जोशी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. नैतिक मूल्यांना सशक्तपणे प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे संस्थेचे ध्येय आहे.

बलात्कार पीडित विवाहितेचा वांद्र्यात आत्महत्येचा प्रयत्न

मुंबई : शहरात एका २७ वर्षीय बलात्कारपीडित महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार वांद्रे येथे घडला आहे. याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी बलात्कार करणाऱ्या नराधमास अटक केली आहे. दरम्यान, दोन बाटल्या फिनाइल पिऊन हाताची नस कापलेल्या या महिलेला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.पीडित महिला विवाहित असून कौटुंबिक ताटातुटीच्या भीतीने तिने हे पाऊल उचलल्याचे समजते.

सोयाबीन पेंड निर्यातीवर १५ टक्के अनुदान मिळावे!

मुंबई : ''सोयाबीन पेंड निर्यातीवर १५ टक्के अनुदान मिळावे, अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आली असून, ही मागणी मान्य झाल्यास महाराष्ट्रासह देशातील सोयाबीन उत्पादक राज्यांना फायदा होईल,'' असा विश्वास महाराष्ट्र राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी व्यक्त केला आहे. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात आयोजित पत्रकार परिषदेत पटेल बोलत होते. ''आयातीत खाद्यतेलावर १० टक्के विकास कर लावणे आणि सोयाबीनवर लावण्यात येणारा पाच टक्के जीएसटी रद्द करण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राने पुढाकार घेतला असून, केंद्र शासनाच्या सहकार्याने हा विषयही लवकरच मार्गी लागेल,'' असे पटेल यांनी सांगितले. महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, राजस्थान, तेलंगण, कर्नाटक, आंध्रप्रदेश या सोयाबीन उत्पादक राज्यांना याचा फायदा होणार असल्याचेही ते म्हणाले.

'शायरी संध्या' कार्यक्रम उत्साहात

मुंबई : 'अहल-ए-अदब' या साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मुशायरा व शायरी संध्या' कार्यक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झालेल्या या कार्यक्रमाने श्रोते व रसिक मंत्रमुग्ध झाले. दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदना झाल्यानंतर गझल गायक आजम असादत खान यांनी 'रुचि दरोलिया'ची गझल 'जब से गिरे हैं इश्क़ में उड़ने लगे हैं देखिए' गाऊन श्रोत्यांना कार्यक्रमाच्या अंतरंगात नेले. ग़ज़लगायक सचिन शर्मा यांनी 'श्री हस्ती मल हस्ती जी'ची प्रसिद्ध ग़ज़ल, 'प्यार का पहला ख़त लिखने में वक़्त तो लगता है' सादर केली.

पालिका शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी विविध उपाययोजना राबवणार : अंजली नाईक

■ दहावीचा अभ्यासक्रम सप्टेंबरमध्येच पूर्ण करणार ■ ऑक्टोबरपासून सरावपरीक्षा घेणार

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): ''मुंबई महापालिका शाळांतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आपण विविध उपाययोजना करत असून, ऑक्टोबरपासून सरावपरीक्षा ही त्यापैकी एक उपाययोजना असेल,'' असे शिक्षण समिती अध्यक्षा अंजली नाईक यांनी सांगितले.

यंदा महापालिका शाळांचा दहावीच्या परीक्षेचा एकूण निकाल ५४ टक्के लागल्याने टक्का घसरल्याची ओरड होत आहे. पण त्यात तथ्य नसल्याचे नाईक म्हणाल्या. २० गुण कमी झाल्याने राज्यभरातील शाळांप्रमाणे महापालिका शाळांच्या निकालावर त्याचा परिणाम झाला. २० गुण जमेस धरल्यास मागील वर्षीप्रमाणे यंदाही निकालाची टक्केवारी ७३ होते. म्हणजे महापालिका शाळांतील शिक्षणाचा दर्जा कायम आहे, हे त्यांनी पटवून दिले. ''मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होऊ नये यासाठी आतापासूनच प्रयत्न करण्यात येणार आहेत. या शैक्षणिक वर्षात दहावीचा अभ्यासक्रम सप्टेंबरमध्येच पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर १५ ऑक्टोबरपासून बोर्डाप्रमाणे सरावपरीक्षा घेण्यात येणार आहेत,'' असे नाईक यांनी सांगितले. ''सराव परीक्षांमध्ये विद्यार्थी कोणत्या विषयात कमी आहेत हे हेरून त्यानुसार त्यांची गटवारी करण्यात येणार आहे आणि तशा प्रकारे त्यांच्याकडून तयारी करून घेण्याचे प्रयोजन आहे. त्यानंतर दुसरी सरावपरीक्षा घेण्यात येणार आहे. सरावपरीक्षांमध्ये मुलांची टक्केवारी वाढली की त्यांच्यात परीक्षेची भीती राहणार नाही,'' असे नाईक यांनी सांगितले.

शिष्यवृत्तीचा निकाल चांगला लागला असून तशाच पद्धतीने दहावीचा निकाल लागला जावा यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे अंजली नाईक यांनी शेवटी सांगितले.

मुंबईतील उमेदवारांसाठी २४ ते २८ जूनदरम्यान होमगार्ड भरती

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): बृहन्मुंबई जिल्ह्यातील उमेदवारांसाठी मुंबई होमगार्डदलाच्यावतीने येत्या दि. २४ ते २८ जून या कालावधीत नवीन सदस्य नोंदणी करण्यात येणार आहे. घाटकोपरमधील पंतनगर येथील पोलीस मुख्यालय, लोहमार्ग कवायत मैदानात सकाळी ८ ते सायंकाळी ४ या कालावधीत ही नोंदणी होणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी नोंदणीस येताना सर्व कागदपत्रांची मूळ व छायांकित प्रत, चार छायाचित्रे आणावीत. या नोंदणीसाठी उमेदवार बृहन्मुंबई जिल्ह्यातील रहिवासी असावा. दहावी उत्तीर्ण असावा. वय २० ते ५० वर्षे, पुरुष उमेदवारांची उंची १६२ सेमी, छाती न फुगवता कमीत कमी ७६ सेंमी व ५ सेंमी फुगली पाहिजे. तर महिला उमेदवारांची उंची १५० सेंमी असावी. यावेळी धावण्याची व गोळाफेक करण्याची मैदानी चाचणी देणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार वैद्यकीयदृष्ट्या पात्र असावा. अधिक माहितीसाठी ०२२-२२८४२४२३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन बृहन्मुंबई होमगार्डचे समादेशक तथा पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे यांनी केले आहे.

भगेरिया इंडस्ट्रीज लि.
(CIN: L40300MH1989PLC052574)
नोंद. कार्यालय: कार्यालय क्र. १००२, १० वा मजला, ट्रेपीवाला सेंटर, ऑफ एस. व्ही. रोड, गोरेगाव (पू), मुंबई ४०० ०६२.
दूरध्वनी: +९१-२२-४०४३६६६६, फॅक्स: +९१-२२-४०४३६६६२०
Email: info@bhageriagroup.com; Website: www.bhageriagroup.com

भागधारकांना सूचना

(विषय: कंपनीचे भाग गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरीत करण्याकरिता)

गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखांकन लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियमन, २०१६, त्यामधील संबंधित परिपत्रके आणि दुरुस्त्यांसह ('आयईपीएफ नियमन') सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदींच्या अनुरोधाने, सूचना देण्यात येते की, कंपनीने त्यांच्या संबंधित भागधारकांना त्यांचे भाग, जर त्यांनी त्यांचा लाभांश, जो सेवी सात (७) सलग वर्षे प्रदान केलेला नाही/दावा केला गेलेला नाही, पुढील देय दिनांकास, म्हणजेच ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत न घेतल्यास, आयईपीएफ नियमांना अनुसरुन आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरण करण्याबाबत सूचना पाठविल्या आहेत.अशा भागधारकांचे त्यांच्या फोलिओ क्रमांक किंवा डीपी आणि क्लायंट आयडी आणि हस्तांतरणाकरिता योग्य भाग संख्या समाविष्ट असलेला तपशील कंपनीच्या वेबसाईट www.bhageriagroup.com वर देखील उपलब्ध आहे.

संबंधित भागधारकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांच्या ताब्यात असलेल्या भागांच्या बाबतीतील दावा न केलेल्या लाभांशाकरिता त्यांचा दावा कंपनीस किंवा कंपनीचे रजिस्ट्रार आणि भाग हस्तांतरण एजंट, मे. शारेक्स डायनामिक (इंडिया) प्रा. लि., सी १०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई-४०००८३. दूरध्वनी: ०२२-२८५१५६०६, ईमेल : support@sharexindia.com वेबसाईट: www.sharexindia.com यांना करावा.

जर भाग/लाभांश आयईपीएफ ला हस्तांतरित झाल्यानंतर भागधारकांना दावा करावयाचा असल्यास आयईपीएफ नियमन अंतर्गत विहीत असल्यानुसार आयईपीएफ-५ च्या स्वरुपात आयईपीएफ प्राधिकरणास स्वतंत्र अर्ज करावा आणि तो विहीत अर्ज सर्व तपशिलासह आयईपीएफ वेबसाईट : www.iepf.gov.in वर उपलब्ध आहे.

भगेरिया इंडस्ट्रीज लिमिटेडकरिता
केतन गौड
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक : जून २२, २०१९